२०० खाटांच्या नवनिर्मित जिल्हा रुग्णालय, औरंगाबाद या रुग्णालयास पाणी पुरवठा होण्यासाठी स्वतंत्र पाईपलाईनच्या अंदाजपत्रक व आराखडयांना प्रशासकीय मान्यता.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-२०१८/ प्र.क्र.३२/ आरोग्य-४
मंत्रालय, १० वा मजला, संकुल इमारत,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई.
तारीख: १० जून, २०१९.

वाचा

सहसंचालक, आरोग्य सेवा, रूग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे/कक्ष-३/ टे-६/ औरंगाबाद २०० खाटापाईपलाईन/ ११५२-५३/१८, दि.०५.०२.२०१८.

प्रस्तावना

२०० खाटांच्या नवनिर्मित जिल्हा रुग्णालय, औरंगाबाद या रुग्णालयास पाणी पुरवठा होण्यासाठी, स्वतंत्र पाईपलाईन बाबतचे रु.१.८७ कोटी इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक व आराखडे सहसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी प्रशासकीय मान्यतेकरीता शासनास सादर केले आहेत. सदर अंदाजपत्रक व आराखडे उप अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी तयार केले आहेत. त्यास, कार्यकारी अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद; कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, औंरंगाबाद; अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद व जिल्हा शल्य चिकित्सक, औरंगाबाद यांनी साक्षांकित केले आहेत. सदर स्वतंत्र पाईपलाईनच्या खर्चासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंदर्भात पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय

नवनिर्मित २०० खाटांचे जिल्हा रुग्णालय औरंगाबाद रुग्णालयास पाणी पुरवठा होण्यासाठी स्वतंत्र पाईपलाईन बाबतच्या रु.१.८७ कोटी (एक कोटी सत्याऐंशी लाख फक्त) इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर कामावरील खर्च पुढील लेखाशीर्षामधील उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

मागणी क्र.एच-८, मुख्यलेखाशिर्ष

“४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०१- नागरी आरोग्य सेवा (वैद्यकीय सहाय्य
११०- रुग्णालये व दवाखाने
(१) (अ)- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-इमारती
(००) (०१)- मोठी बांधकामे (४२१० ००१४)
५३- मोठी बांधकामे ”

सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौ.सं.क्र. ४२७/१८/इमा-२, दि.१२.१०.२०१८ अन्वये दर्शविलेल्या सहमतीनुसार आणि वित्त विभागाच्या शा.नि. क्र.विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/ २०१३/ विनियम,भाग-२, दि.१७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील भाग-पहिला, उपविभाग-पाच मधील अनुक्रमांक १ येथील परिच्छेद क्र.१३४ अनुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१०१०४८२८०६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b869fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68d63f,
cn=Pradip M Balkavde
Date: 2019.06.10 11:53:55 +05'30'

(प्र. मो. बलकवडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल १ / २, महाराष्ट्र (लेखा व लेखापरिक्षा) / लेखा व अनुज्ञेयता, मुंबई/ नागपूर.
२. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
३. सहसंचालक, आरोग्य सेवा, रूग्णालये (राज्यस्तर), मुंबई.
४. सहाय्यक संचालक (लेखा व लेखापरिक्षा),आरोग्य सेवा, पुणे.
५. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), पुणे.
६. उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळ, औरंगाबाद.
७. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रूग्णालय, औरंगाबाद.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद.
९. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद.
१०. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई
११. वित्त विभाग (विनियम कार्यासन), मंत्रालय, मुंबई.
१२. अवर सचिव (अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई
१३. निवडनस्ती(आरोग्य-४), सा.आ.वि.